महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## पिवळी नदी,ऑल इंडिया रेडियो,आणि लोक विहार मेट्रो स्टेशनच्या पाईलचे १००% कार्य पूर्ण



नागपूर – नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या फ़ेज - २ निर्माण कार्य कामठी,वर्धा,हिंगणा आणि भंडारा महामार्गावर सुरु असून कामठी महामार्गावरील पिवळी नदी,ऑल इंडिया रेडियो,आणि लोक विहार मेट्रो स्टेशनच्या पाईलचे कार्य १००% हे पूर्ण झाले आहे. या तिन्ही मेट्रो स्टेशनवरील पिवळी नदी येथील १४८ पैकी १४८,ऑल इंडिया रेडियो येथील १२२ पैकी १२२ आणि लोक विहार येथील १४० पैकी १४० पाईल  कार्य पूर्ण झाले असून असून उर्वरित रिच मधील

अन्य कार्य देखील गतीने सुरु आहे. ज्यामध्ये कामठी महाममार्ग रिच - २ए (आटोमोटिव्ह चौक ते कन्हान) पियर ६८%, पाईल कॅप ७७%,सेगमेंट कास्टिंग ४०% आणि स्पॅन इरेक्शन २६% पूर्ण झाले आहे.

नागपूर मेट्रो फेज-II चा विस्तार:

फेज-II मध्ये एकूण 43.8 किमी लांबीच्या 32 मेट्रो स्थानकांचा समावेश असून हा टप्पा नागपूर शहराच्या उपनगरांपर्यंत विस्तारित होणार आहे.

प्रमुख मार्ग व स्थानके:

1. खापरी ते MIDC ESR (18.5 किमी, 10 स्थानके)

- ईको पार्क, मेट्रो सिटी, अशोक वन, डोंगरगाव, मोघाव, मेघदूत CIDCO, बुटीबोरी पोलीस स्टेशन, म्हाडा कॉलनी, MIDC KEC, MIDC ESR

2. प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगर (5.6 किमी, 3 स्थानके)

- पारडी, कापसी खुर्द, ट्रान्सपोर्ट नगर

3. ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कान्हान (13 किमी, 12 स्थानके)

- पिली नदी, खासरा फाटा, ऑल इंडिया रेडिओ, खेरी फाटा, लोकविहार, लेखा नगर, कँटोन्मेंट, कंम्प्टी पोलीस स्टेशन, गोल्फ क्लब, कान्हान नदी

4. लोकमान्य नगर ते हिंगणा (6.7 किमी, 7 स्थानके)

- हिंगणा माउंट व्ह्यू, राजीव नगर, वानाडोंगरी, APMC, रायपूर, हिंगणा बस स्टँड, हिंगणा

